# * ऋणनिर्देश *

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी **'ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेचा अभ्यास'** हा लघुप्रबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे.

या लघुप्रबंधाच्या निर्मितीमागे अनेकांची प्रेरणा, आशीर्वाद, प्रोत्साहन आहे. त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजते.

लघुप्रबंध लेखनाच्या यशस्वीतेचे मुख्य श्रेय जाते ते मार्गदर्शक डॉ. प्रकाश कुंभार सर यांना. विषय निवडीपासून लघुप्रबंधलेखन पूर्ण होईपर्यंत सर्व प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी जागरूकतेने व सहृदयतेने केले. त्यांची मी अंत:करणपूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रणधीर शिंदे व प्रा. हिमांशू स्मार्त इ. गुरूजन वर्ग व डॉ. महेश खरात, प्रा. सर्जेराव जाधव, सौ. स्वाती पवार यांच्याशी केलेली अभ्यासपूर्ण चर्चा लघुप्रबंधलेखनास प्रेरक व महत्त्वपूर्ण ठरली. तसेच ज्ञानेश्वर कोळी यांनी केलेले सहकार्य, आई-वडिलांचे चिरदायी आशीर्वाद व मित्र-मैत्रिणींचे प्रोत्साहन या सर्वांमुळेच हे लेखन पूर्ण होऊ शकले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे ग्रंथालय व बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची मोलाची मदत या लघुप्रबंधाच्या पूर्णत्वासाठी लाभली. वारणा विभाग शिक्षणमंडळाचे सचिव मा. जी.डी. पाटील व वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम्. गुरव यांनी माझा आत्मविश्वास वाढवला व लेखनास प्रेरणा दिली. या सर्वांची मी सदैव ऋणी राहीन.

श्री. विष्णू खाडे, यांनी संगणकीकृत टायपिंग वेळेवर, बिनचूक व आकर्षक करून दिले त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

तसेच अनेक नातलगांनी आणि ज्ञात-अज्ञातांनी माझ्या लघुप्रबंधासाठी सुयश चिंतले अशा सर्वांची मी आभारी आहे.

– **प्रीती प्रतापराव शिंदे**

---